# राशिभविष्य - एप्रिल, २०१८

**दादा दामले (dadadamle@gmail.com)**

=====================================================

**(१) मेष -** या राशीच्या मंडळींचा स्वभाव सध्या अस्थिर, चंचल, लहरी असा झाला असण्याची शक्यता जाणवते. त्यामुळे कोणी काही समजावून सांगितले, तर लगेच अपमान झाला असे वाटून संताप येत असला पाहिजे. या राशीची लहान मुले तर अतिशय वांड, व्रात्य, खोडकर अशी झाली असावीत असे वाटते. असे सर्व हर्षल या बुद्धीमान, अहंकारी ग्रहामुळे घडत असेल. पण हाच हर्षल शास्त्रीय संशोधन कार्यात कार्यमग्न असणारांना उपयुक्त होईल. हर्षलबरोबर शुक्र असल्याने या राशीच्या मंडळींना वैवाहिक जीवनातील सुख लाभेल. तसेच महिन्याचा पूर्वार्ध सर्व दृष्टीने चैनीत सुखाचा जाईल. पण महिन्याच्या उत्तरार्धात रवि ग्रह या राशीच्या प्रथम स्थानी आल्यावर मनस्ताप देणाऱ्या घटना घडण्याची शक्यता जाणवते. कसली तरी चिंता त्रस्त करील. काहींना शारीरिक अनारोग्याचा त्रास होणे संभवते. रक्तदाब, हृदयविकार असणारांनी मनस्थिती शांत ठेवण्याचा प्रयत्न करावा. महिन्याच्या पूर्वार्धात अनपेक्षित खर्च निर्माण होतील व त्याची चिंता त्रस्त करील. जपा. पण दिनांक १९ पासून प्रथम स्थानी असलेला शुक्र धनस्थानी गेल्यावर कौटुंबिक सुखसमाधान लाभेल. धनलाभ होणेही संभवते. पण या राशीच्या चतुर्थ स्थानी असलेला राहू सुख लाभू देणार नाही. कौटुंबिक समस्या त्रस्त करतील, वाद, गैरसमज अशापैकी कारणांनी मनस्ताप होणे संभवते. हाती घेतलेल्या कामात अपयश येण्याची शक्यताही दिसते. या राशीच्या विवाहेच्छू युवक युवतींना विवाहयोग संभवतो. प्रवासाचे योग संभवतात. काहींचे नवे स्नेहसंबंध जुळून येतील. प्रेम संबंध असतील तर ते दृढ होतील. या राशीच्या भाग्यस्थानी शनि-मंगळ हे शत्रू ग्रह युतीत असल्याने शक्यतो प्रवास करू नका. प्रवासात मानहानी, त्रास होणे संभवते. या राशीच्या युवकांनी सध्या आहे ती नोकरी वा व्यवसायच करावा. नवीन काही करण्याचा विचारही करू नये. व्यापारात नुकसान होणे संभवते. कुमार्गी मित्रांपासून दूर राहा. लाभस्थानी असलेला नेपच्यून आर्थिक समस्या निर्माण करील. जपा. श्रद्धा असेल तर श्रीगणेश उपासना अनुकूल होईल व मन:शांती लाभेल.

**(२) वृषभ -** या राशीच्या मंडळींना या महिन्याचा पूर्वार्धच अधिक अनुकुल व लाभदायक होईल. म्हणून त्यांनी जे काय साध्य करावयाचे ते महिन्याच्या पूर्वार्धातच साधून घेण्याचा प्रयत्न करावा. लाभस्थानी असलेल्या बुधामुळे नवे मित्र मिळतील व धनलाभ होणेही संभवते. महिन्याच्या उत्तरार्धात घरी दारी सर्व ठिकाणी प्रतिकुल

परिस्थितीशीच मुकाबला करावा लागेल. अशा परिस्थितीत या राशीची काही मंडळी “वरून कीर्तन, आतून तमाशा “ असे ढोंगी आचरण करण्याची शक्यता दिसते. पण त्यांनी तसे करू नये. या राशीच्या अष्टम स्थानी असलेल्या शनि-मंगळ या शत्रू ग्रहांमुळे शारीरिक-मानसिक अनारोग्य होणे संभवते. काही मंडळींना मूळव्याधी सारख्या उष्णता विकाराचा आजार त्रस्त करील; तर काहींना एखादा मोठा आजार होणे संभवते. काहींची आजार प्रतिकार शक्ती कमी झाल्यामुळे एखाद्या किरकोळ आजाराचा त्रास सहन करणेही कठीण होईल. छोट्या मोठ्या अपघाताने हाडमोड होणेही संभवते. जपा. वीज, पाणी यांपासून धोका असल्यामुळे जलप्रवास करू नका. पाण्यात पोहायला जाऊ नका. याशिवाय काही मंडळींचा अपेक्षाभंग होणेही संभवते. काही मंडळींच्या जीवनात असमाधानकारक घटना घडणेही संभवते. काहींना आर्थिक समस्या त्रस्त करील. जपा. दशम स्थानी असलेल्या नेपच्यूनमुळे नोकरी-व्यवसायात अस्थिर परिस्थिती निर्माण होण्याची शक्यता दिसते. राहूमुळे बंधुसुखात बाधा येणे संभवते. व्ययस्थानी असलेल्या हर्षलमुळे नातेसंबंधात शत्रुत्व निर्माण होणे, काही मंडळींना बेअब्रू होणाऱ्या प्रसंगाला सामोरे जावे लागणे, काहींना जिवावरच्या प्रसंगाला तोंड द्यावे लागण्याची शक्यता आहे. जपा. शिवाय आर्थिक विवंचना त्रास करीलच. जपा. पण शुभ ग्रह गुरुशुक्राच्या अनुकुलतेने मधून मधून मनोनुकुल घटना घडतील व दिलासा मिळेल. श्रद्धा असेल तर श्रीगणेश व श्रीहनुमान उपासना मन:शांती देईल.

**(३) मिथुन** - या राशीच्या सर्व प्रकारच्या नोकरदार मंडळीना या महिन्याचा संपूर्ण काळ अनुकुल, प्रगतिकारक व लाभदायक होईल. शासकीय , निम-शासकीय नोकरदार मंडळींना तर बढती, मानाचे स्थान, पगारवाढ अशा प्रकारचे लाभ होणे संभवते. व्यापार-व्यवसाय असणारांना मात्र अनिश्चित परिस्थितीला सामोरे जावे लागेल. पण अर्थलाभ होणे संभवते. लाभस्थानी असलेल्या हर्षलमुळे मित्रांशी भांडणे होणे संभवते. जपा. अशा परिस्थितीत शुक्र ग्रहाच्या पूर्ण अनुकुलतेमुळे सर्व प्रकारचे लाभ होतील, अपेक्षित सुखसमाधान लाभेल. ऐषआरामाची साधने प्राप्त होतील. पण कुटुंब स्थानी असलेल्या राहूमुळे जीवनसाथीला अपार कष्ट करावे लागतील. शिवाय काहींना आर्थिक चिंताही त्रस्त करीलसे वाटते. तसेच काही मंडळींना अनारोग्याचा त्रास होणे संभवते. रक्तविकार, त्वचा रोग अशापैकी आजार होणे संभवते. तसेच अपघातभय असल्याने सतत सावधानतेने आचरण करा. वाहने जपून चालवा. वैवाहिक जीवनातील अपेक्षित सुखात विविध कारणांनी बाधा येणे संभवते. जपा. या राशीच्या सप्तम स्थानी शनि-मंगळ हे शत्रू ग्रह असल्याने

अपेक्षाभंग होणे, असमाधानकारक घटना घडणे, भागीदारीत व्यापार-व्यवसाय असणारांच्या भागीदारीत बाधा उत्पन्न होणे, काही मंडळींना कायदा कचेरीचा त्रास होणे संभवते. पंचम स्थानी असलेल्या गुरु ग्रहामुळे या राशीच्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक प्रगती करणे शक्य होईल. नवे प्रेमसंबंध निर्माण होतील. काहींना अर्थलाभ होणेही शक्य आहे. अध्यात्मात रस असणारांना उपासनेद्वारे मन:शांती लाभेल. काही मंडळींना सूचक स्वप्ने पडतील. काहींना परदेशगमनाची संधी मिळेल. श्रद्धा असेल तर श्रीगणेश उपासना अनुकुल होईल. दररोज स्नान झाल्यावर नियमितपणे "गणपति अथर्व शीर्ष" चे पठण करा.

**(४) कर्क -** या राशीच्या मंडळींना या महिन्याचा काळ विशिष्ट नोकरी-व्यवसाय असणारांनाच अनुकुल, प्रगतिकारक व लाभदायक होईल. उच्च बौद्धिक व शास्त्रीय संशोधन कार्यक्षेत्र असणारांना काळ अनुकुल, प्रगतिकारक व यशदायक होईल. शासकीय, निम-शासकीय नोकरदार मंडळीना महिन्याचा उत्तरार्धच अधिक अनुकुल व लाभदायक होईल. महिन्याच्या पूर्वार्धात काही ग्रहांच्या कुयोगामुळे मनस्ताप सहन कराव्या लागणाऱ्या घटना घडतील. वैद्यकीय व्यवसाय , औषध विक्रेते, यांत्रिकतांत्रिक नोकरी, व्यवसाय असणारांना तसेच लोखंड, कोळसा यांचा व्यापार-व्यवसाय असणारांना काळ अनुकुल, प्रगतिकारक व लाभदायक होईल. पण कला क्षेत्रातील मंडळींना मात्र महिन्याचा उत्तरार्धच अनुकुल व लाभदायक होईल. जल भय आणि विषभय असल्याने बाहेरचे उघड्यावरचे पदार्थ खाणे वर्ज्य करा. तसेच पाण्यात पोहणे, जलविहार करणे शक्यतो टाळा. या राशीच्या चतुर्थ स्थानी असलेल्या गुरु ग्रहामुळे कौटुंबिक सुखसमाधान लाभेल; पण नातेवाईक मंडळीपासून त्रास होणे संभवते. जपा. काही मंडळीचे स्थावर खरेदी-विक्रीचे व्यवहार अपेक्षेनुसार पार पडतील. काही मंडळींना अपमान सहन करावा लागण्याची शक्यता दिसते. काहींना वातविकार त्रस्त करतील. सप्तम स्थानी असलेल्या केतुमुळे अस्थिर मनस्थिती राहील. तसेच वैवाहिक जीवनातील सुखात बाधा येणे संभवते. गुरु ग्रहाची ही उच्च राशी असल्यामुळे श्रीगुरुदेव दत्तात्रेयाची उपासना मन:शांती देईल. दररोज नियमितपणे "बावन्न श्लोकी गुरुचरित्राचे " पठण करा.

**(५) सिंह -** या राशीच्या मंडळींना या महिन्याचा काळ अनुकुल-प्रतिकुल असे संमिश्र अनुभव देणारा असाच असणार आहे. या राशीच्या नोकरदार मंडळींना अपयश, मनस्ताप, दु:ख , नैराश्य देणाऱ्या घटनांशी मुकाबला करत काळ व्यतीत करावा लागेलसे दिसते. पण बुध-हर्षल अनुकुल असल्याने शास्त्रीय संशोधन

कार्यात कार्यरत असणारांना संपूर्ण महिन्याचा काळ अनुकुल, प्रगतिकारक , यशदायक व लाभदायक होईल. काही मंडळींना परदेशगमनाची संधी मिळणेही संभवते. महिन्याच्या पूर्वार्धात शुक्र ग्रहाची अनुकुलता असल्यामुळे काही मंडळींना थोर कृपा, गुरुकृपा, प्राप्त होणेही संभवते. काही मंडळींना कीर्ती-प्रसिद्धी मिळणेही शक्य आहे. पण हाच शुक्र ग्रह महिन्याच्या उत्तरार्धात प्रतिकुल होणार असल्याने अडचणी, अडथळे, मनस्ताप सहन करावा लागणे संभवते. त्यामुळे महिन्याच्या पूर्वार्धातच जे काय साधावयाचे ते साधून घेण्याचा प्रयत्न करा. व्यय स्थानी असलेला राहूही अनुकुल असून काहींना अर्थलाभ, शत्रूपासून संरक्षण मिळू शकेल. पण हा राहू नेपच्यूनसह वैवाहिक जीवनातील सुखात बाधा निर्माण करील. जपा. या राशीच्या पंचम स्थानी असलेल्या शनि-मंगळ या शत्रू ग्रहांमुळे अनुकुल-प्रतिकुल अनुभव येतील. बौद्धिक , यांत्रिक-तांत्रिक नोकरी-व्यवसाय असणाराना काळ अनुकूल होईल; पण संतति समस्या त्रस्त करतील. काहींना स्थावरसंबंधी समस्या त्रस्त करील. काहींना अनारोग्याचा त्रास सहन करावा लागेल. गर्भवती स्त्रियांनी अकारण दगदग करू नये. गुरु ग्रहामुळे साहित्यिकांचे साहित्य ग्रंथ रूपाने प्रसिद्ध होईल. पण भावंडाकडून मनस्ताप दिला जाण्याची शक्यता आहे. श्रद्धा असेल तर कुलदैवताची उपासना अनुकुल होईल.

**(६) कन्या -** या राशीच्या मंडळींना या महिन्याचा काळ फारसा अनुकुल नाही, असेच म्हणावे लागेल. या राशीच्या चतुर्थ स्थानी शनि-मंगळ हे शत्रू ग्रह असल्याने कौटुंबिक जीवनात गैरसमज, भांडणतंटे, असमाधानकारक घटना अशापैकी कारणांनी सुखसमाधान लाभणार नाही. उलट गहरे नैराश्य येणे संभवते. घरात माता असेल तर तिच्या अनारोग्याची चिंता त्रस्त करील. विशेष म्हणजे या राशीच्या मंडळींना उगीचच आपणास काही आजार झाला असल्याची काल्पनिक चिंता त्रस्त करील. तसेच फसवणूक झाल्याचा त्रास होणे संभवते. या राशीच्या विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीत अडथळे येण्याची शक्यता आहे. त्यामुळे काही मंडळींच्या संततिसुखात बाधा येणे संभवते. या राशीच्या नोकरदार मंडळीना महिन्याचा पूर्वार्धच काही प्रमाणात अनुकुल होईल. महिन्याच्या उत्तरार्धात सावधानतेने आचरण केले पाहिजे. कारण अपघात भय आहे. जपा. महिन्याच्या पूर्वार्धात शुक्र ग्रहाच्या अनुकुलतेमुळे फारसे कष्ट न घेता अपेक्षित अर्थलाभ होईल. ज्यांच्या जन्मकुंडलीत अचानक धनलाभ योग आहे अशापैकी काहींना असा अचानक धनलाभ किंवा वारसा हक्काने धनलाभ होणे संभवते. पण या राशीच्या वयोवृद्ध मंडळींनी अकारण दगदग करू नये. नपेक्षा अनारोग्याचा त्रास सहन करावा लागेल.

महिन्याच्या उत्तरार्धात हा शुक्र ग्रह या राशीच्या भाग्यस्थानी गेल्यावर सुखसमाधान लाभेल. काहींना गुरुकृपा तर काहींना थोर मंडळींची कृपा प्राप्त होईल. काहींना कीर्ती-प्रसिद्धी मिळणेही शक्य आहे. या राशीच्या लाभस्थानी असलेल्या राहूमुळे शासकीय नोकरीतील काही मंडळींना एखादे अधिकारपद मिळू शकेल. पण अधिकाराचा गैरवापर करून वाममार्ग धन मिळविण्याचा मोह आवरला पाहिजे. या राशीच्या धनस्थानी असलेल्या गुरु ग्रहामुळे कुटुंबात मधून मधून मनोनुकुल घटना घडतील, स्वतंत्र व्यवसाय असणारांच्या व्यवसायात प्रगती होईल व सुखसमाधान लाभेल. श्रद्धा असेल तर श्रीगुरुदेव दत्तात्रेयाची उपासना मन:शांती देईल. दररोज नियमितपणे “बावन्न श्लोकी गुरुचरित्रा"चे पठण करा.

**(७) तुळा -** या राशीच्या मंडळींना या महिन्याचा काळ अनुकुल आहे असेच म्हणावे लागेल. या राशीच्या सर्व प्रकारच्या नोकरदार मंडळींना त्यांच्या योग्यतेनुसार विविध प्रकारचे लाभ होतील. विशेष करून बौद्धिक, शैक्षणिक, शास्त्रीय संशोधनात्मक कार्यक्षेत्र असणारांना काळ प्रगतिकारक, यशदायक व लाभदायक होईल. साहित्यिकांचे लेखन ग्रंथरूपाने प्रसिद्ध होईल. शासकीय, निम-शासकीय नोकरदार मंडळींना बढती, पगारवाढ, एखाद्याला उच्च पद असे काही मिळू शकेल. या राशीच्या काही युवक -युवतींना उत्तम नोकरी किंवा आवडते कार्यक्षेत्र मिळू शकेल. हिम्मत , धैर्य, आत्मविश्वास वाढेल. कर्तबगारी दिसून येईल. मात्र प्रवास जपून करा. इजा , दुखापत होणे संभवते. जपा. पण सध्या या राशीच्या काही मंडळीची मनस्थिती अत्यंत भावनाशील झाली असणेही संभवते. अध्यात्माची मनापासून आवड असेल तर उपासनेद्वारे सात्विक सुखशांती मिळू शकेल. हितशत्रू पराभूत होतील. पण या राशीच्या ज्या मंडळींना हृदयविकार आहे त्यांनी मनाचा क्षोभ होणार नाही याची काळजी घ्यावी. तसेच या राशीच्या काही मंडळींना पोटविकाराचा आजार त्रस्त करील. विशेष करून महिन्याच्या पूर्वार्धात जीवनसाथीच्या लहरी , विक्षिप्त आचरणामुळे, दोघांतील वाद, मतभेद, गैरसमज अशापैकी कारणांनी वैवाहिक जीवनातील सुखात बाधा येणे संभवते. जपा. ज्यांचा भागीदारीत व्यापार-व्यवसाय असेल त्यांनी गैरसमज, संशय अशापैकी कारणानी भागीदारीत बाधा येणार नाही, याची काळजी घ्यावी. कोणाची कोर्ट प्रकरणे असतील तर त्यांनी ती पुढे ढकलण्याचा प्रयत्न करावा. नपेक्षा अपयश येणे संभवते. महिन्याच्या उतरार्धात काहींना अचानक धनलाभ वा वारसाहक्काने धनलाभ होणे संभवते. श्रद्धा असेल तर श्रीगणेश व श्रीहनुमान उपासना मन:शांती देईल.

**(८) वृश्चिक -** या राशीच्या मंडळींना या महिन्याचा काळ फारसा अनुकुल नाही असेच म्हणावे लागेल. त्यामुळे या राशीच्या मंडळींनी या महिनाच्या काळात मन व विचारशक्तीवर नियंत्रण ठेवून आणि सहनशील बनून नम्रतेचे आचरण करणेच सुखाचे होईल. एकूण सर्वच ग्रहस्थिती प्रतिकुल असल्याने हट्टाला पेटून जिद्दीने काही कृती करण्यास सिद्ध होऊ नये. नपेक्षा आर्थिक नुकसान व असह्य मनस्तापच सहन करावा लागेल. त्यातून अनारोग्य होणेही शक्य आहे. जपा. अध्यात्मात रस असेल तर आध्यात्मिक उपासना करा. जिभेला लगाम घाला आणि शांत राहा. शक्यतो प्रवास करू नका. प्रवासात अडचणी त्रास होणे संभवते. तसेच कौटुंबिक सुखातही विविध कारणानी बाधा येणे, अपेक्षाभंग होणे संभवते. या राशीच्या धनस्थानी असलेल्या शनि-मंगळ या शत्रू ग्रहांमुळे काहींना आर्थिक समस्या त्रस्त करील. काहींना अनपेक्षित आर्थिक संकटांना तोंड कसे द्यायचे याची चिंता त्रस्त करील. आर्थिक येणे असेल तर त्यास विलंब होईल. पण देणे असेल तर असह्य मनस्तापच सहन करावा लागेल. त्यामुळे शारीरिक उष्णता भडकून उष्णताविकाराचा आजार त्रस्त करील. घसा, मान, दाढा, डोळे यांपैकी कसला तरी आजार त्रस्त करील. काही मंडळीना डोकेदुखी किंवा मेंदूविकाराचा आजार त्रस्त करील. शनिमुळे कुटुंबात अनिष्ट घटना घडण्याची शक्यता आहे. जपा. या राशीच्या नोकरदार मंडळींना महिन्याचा उत्तरार्धच
अनुकुल व लाभदायक होईल. पण महिन्याच्या पूर्वार्धात वरीष्ठांचा जाच सहन करावा लागेलसे दिसते. जपा. महिन्याच्या उत्तरार्धात जीवनसाथीच्या कलागुणामुळे वैवाहिक जीवनात सुखसमाधान लाभेल. प्रेम संबंध असणारांना विवाहयोग संभवतो. श्रद्धा असेल तर श्रीगणेश व श्रीहनुमान उपासना मन:शांती देईल.

**(९) धनु -** या राशीच्या मंडळींना या महिन्याचा काळ फारसा अनुकूल नाही, असेच म्हणावे लागेल. शारीरिक-मानसिक आरोग्य जपणे आवश्यक होईल. शनि-मंगळ हे दोन्ही शत्रू ग्रह प्रथम स्थानी असल्यामुळे स्वत:च्या व जीवनसाथीच्या आरोग्यविषयक समस्या त्रस्त करतील. सतत मनस्ताप देणाऱ्या घटना घडण्याची शक्यता दिसते. नियोजित कार्यात अडथळे येणे, कुटुंबातील प्रिय व्यक्तींचे स्थलांतर होणे, शिवाय स्वाभाविक दोष असल्यास अकारण दगदग होणे अशापैकी घटना त्रस्त करतील. त्यात भर म्हणून आर्थिक समस्याही अस्वस्थ करतील, असे वाटते. मनस्थिती भावनाशील असल्यामुळे अध्यात्मात रस असल्यास उपासनेद्वारे मनस्वास्थ्य लाभेल. या राशीच्या सर्व प्रकारच्या नोकरदार मंडळींना नोकरीत काळ प्रतिकुल असल्याचाच अनुभव येईल. वरीष्ठांचा त्रास सहन करावा लागेलसे

दिसते. छुप्या शत्रूंचा त्रास होणे संभवते. तसेच नव्याने शत्रुत्व होणेही शक्य दिसते. पण उच्च बौद्धिक व शास्त्रीय, गूढ संशोधन कार्यक्षेत्र असणारांना मात्र काळ अनुकुल, प्रगतिकारक व यशदायक होण्याची शक्यता आहे. तसेच कलात्मक कार्यक्षेत्र असेल त्यांनाही काळ अनुकुल होण्याची शक्यता आहे. काही मंडळींना जलप्रवासाचे तर काहींना परदेशगमनाचे योग संभवतात. पण काही मंडळींजवळ कलात्मक गुण असूनही अपेक्षित संधी न मिळाल्याने त्यांना नैराश्य येणे संभवते. ज्यांच्या जन्मकुंडलीत योग आहे अशापैकी काहींना अचानक धनलाभ किंवा वारसा हक्काने धनलाभ होणे संभवते. काहींना वाममार्ग धन मिळू शकेल. लाभस्थानी असलेल्या गुरु ग्रहामुळे मधून मधून मनोनुकुल घटना घडतील व दिलासा मिळेल. या राशीच्या विवाहेच्छू युवकयुवतींना विवाहयोग संभवतो. विद्यार्थ्यांना शैक्षणिक प्रगती करणे शक्य होईल. काहींना नवे मित्र मिळतील. श्रद्धा असेल तर श्रीगुरुदेव दत्तात्रेयाची उपासना मन:शांती देईल. दररोज नियमितपणे “बावन्न श्लोकी गुरुचरित्रा"चे पठण करा.

**(१०) मकर -** शनि ग्रहाच्या साडेसातीचा प्रतिकुल काळ असल्यामुळे या राशीच्या मंडळींनी मनावर संयम ठेवून व सहनशील बनून सतत नम्रतेचे आचरण करणेच सुखाचे होईल. शिवाय शनिसह मंगळही व्ययस्थानी असल्यामुळे सतत मानहानीचे अनुभव येतील. तसेच असह्य मनस्ताप सहन करावा लागण्याची शक्यता आहे जपा. त्यामुळे शारीरिक-मानसिक अनारोग्य होणेही शक्य आहे. गैरसमज, वाद, भांडणे यांमुळे असह्य मनस्ताप होईल. त्यात भर म्हणून आर्थिक समस्याही त्रस्त करण्याची शक्यता आहे. सर्व आर्थिक व्यवहार सावधानतेने व साधकबाधक विचार करूनच करा. या राशीच्या व्यापारी मंडळींना स्त्री-ग्राहकांकडून

त्रास होणे संभवते. या राशीच्या नोकरदार मंडळीना या महिन्याचा पूर्वार्धच अनुकुल होणार असल्यामुळे त्यांनी जे काय साध्य करावयाचे ते महिन्याच्या पूर्वार्धातच साधून घेण्याचा आटोकाट प्रयत्न करावा. महिन्याच्या उत्तरार्धात घरीदारी सर्व ठिकाणी

मनस्तापच सहन करावा लागेलसे दिसते. पण ज्यांचा शेती-व्यवसाय आहे त्यांना शुक्रामुळे महिन्याचा पूर्वार्ध लाभदायक होईल. महिन्याचा उत्तरार्ध या राशीच्या सर्व प्रकारच्या कलावंत मंडळींना अनुकुल, प्रगतिकारक व लाभदायक होईल. मानसिक समाधान लाभेल. सप्तम स्थानी असलेल्या राहूमुळे वैवाहिक जीवनातील सुखात वाद, गैरसमज, मतभेद अशापैकी कारणांनी असह्य मनस्ताप

होणे संभवते. जपा. पण या राशीच्या दशम स्थानी असलेल्या गुरु ग्रहामुळे बौद्धिक व शास्त्रीय संशोधनात्मक कार्यक्षेत्र असणारांना काळ प्रगतिकारक, यशदायक व लाभदायक होईल. श्रद्धेने शिवोपासना, गणेश उपासना व हनुमान उपासना करा. दररोज नियमितपणे “हनुमानचालिसा" स्तोत्राचे पठण करा.

**(११) कुंभ -** सध्या या राशीच्या मंडळींची मनस्थिती अत्यंत कोमल झाली असण्याची शक्यता वाटते. त्यामुळे मानसिक संवेदनाही अति शीघ्र होत असण्याची शक्यता वाटते. त्यामुळे मनाविरुद्ध थोडे काहीही घडले तर लगेच गहरे नैराश्य येणे शक्य आहे. नोकरी व्यवसायाच्या दृष्टीने या राशीच्या मंडळींना महिन्याचा उत्तरार्धच अनुकुल होईल. महिन्याच्या पूर्वार्धात वाद, भांडणे, आर्थिक समस्या, आर्थिक नुकसान , डोळ्याचे अनारोग्य अशापैकी घटना त्रस्त करण्याची शक्यता दिसते. पण बुध ग्रहामुळे अर्थप्राप्ती होणेही संभवते. महिन्याच्या उत्तरार्धात परिस्थितीत बदल होणे संभवते. महिन्याच्या पूर्वार्धात शुक्र ग्रहाच्या अनुकुलतेमुळे या राशीच्या काही मंडळींना भूमिलाभ तर काहींना मानाचे स्थान तर काहींना प्रतिष्ठा प्राप्त होणे संभवते. या राशीच्या व्यापारी मंडळीना स्त्री-ग्राहकांकडूनच अधिक अर्थलाभ होईल. या राशीची जी मंडळी शास्त्रीय संशोधनात्मक कार्यक्षेत्रात कार्यरत आहेत त्यांना उच्च प्रकारची संशोधक बुद्धी, आकलनशक्ती व स्मरणशक्ती असल्यामुळे त्यांना आपल्या संशोधन कार्यात प्रगती साधणे शक्य होईल. काहींना परदेशगमनाची संधी मिळणेही संभवते. महिन्याच्या उत्तरार्धात शुक्र ग्रह या राशीच्या चतुर्थ स्थानी गेल्यावर ज्यांची शेतीवाडी आहे अशांना त्यापासून धनलाभ होईल. इतरांना कौटुंबिक सुखसमाधान लाभेल. ज्यांचा इतर धर्मियांशी व्यावसायिक संबंध आहे अशांना अशा संबंधामुळे व्यावसायिक लाभ व अर्थलाभ होणे संभवते. हितशत्रू पराभूत होतील. मित्रांशी वितुष्ट येणे संभवते. पण काहींना मूल्यवान वस्तूंचा लाभ होणेही शक्य आहे. मात्र शनीमुळे संततिसुखात बाधा येण्याची शक्यता आहे. जपा. भाग्य स्थानी असलेल्या गुरु ग्रहामुळे अध्यात्मात रस असणारांना उपासनेद्वारे मन:शांती मिळू शकेल. प्रवासाचे योग येतील. श्रद्धेने हनुमान उपासना करा. दररोज नियमितपणे “हनुमानचालिसा" स्तोत्राचे पठण करा.

**(१२) मीन -** या राशीच्या मंडळींची वर्तमान मनस्थिती अत्यंत अस्थिर, चंचल, लहरी व अविचारी अशी झाली असण्याची शक्यता वाटते. तसे असेल तर कोणी समजुतीच्या चार गोष्टी सांगितल्या तर तो असह्य अपमान वाटून आपल्या फटकळ बोलण्याने समोरच्याचा अपमान केला जात असण्याची शक्यता वाटते.

तसेच दैनंदिन आचरणही विक्षिप्त असे होत असावे, असे वाटते. अशी अवस्था होण्याचे मुख्य कारण आर्थिक समस्या असावी, असे वाटते. त्याशिवाय अनारोग्याचा त्रासही अशा आचरणाला कारणीभूत असावा असे वाटते. रक्तदाब, हृदयविकार असे आजार असणारांनी तर सतत संयम व सहनशीलतेचे आचरण करणे अगत्याचे होईल. त्यामुळे अशा विक्षिप्त आचरणाला थोडा लगाम घातला जाईल व आरोग्यही फारसे बिघडणार नाही. शारीरिक उष्णता भडकून काहींना डोळ्याचे अनारोग्य त्रस्त करीलसे दिसते. काही मंडळींना कुसंगतीचा त्रास सहन करावा लागेलसे दिसते. मित्रांशी वैर होणेही संभवते. पण मनावर संयम ठेवून व सहनशील बनून आचरण केल्यास शुक्र ग्रहाच्या अनुकुलतेने कौटुंबिक सुखसमाधान मिळू शकेल. महिन्याच्या उत्तरार्धात या शुक्र ग्रहामुळे काही मंडळींना भूमिलाभ, काहींना धनलाभ तर काहींना मान, प्रतिष्ठा असे काही मिळू शकेल. या राशीच्या व्यापारी मंडळींना स्त्री-ग्राहकांकडूनच अधिक अर्थलाभ होईल. या राशीच्या पंचम स्थानी असलेल्या राहूमुळे दलाली, कमिशन वर व्यवसाय करत असणारांना काळ लाभदायक होईल. पण या राहूमुळे संततिसुखात बाधा येण्याची शक्यता आहे. या राशीच्या गर्भवती स्त्रियांनी अकारण दगदग करू नये. या राशीच्या अष्टम स्थानी असलेल्या गुरु ग्रहामुळे काही मंडळींना अचानक धनलाभ तर काहींना वारसा हक्काने धनलाभ होणे संभवते. दशम स्थानी शनि-मंगळ युती असल्याने नोकरी-व्यवसायात कांतिकारक घटना घडण्याची शक्यता वाटते. व्ययस्थानी असलेल्या नेपच्यूनमुळे गहरे नैराश्य येण्याची शक्यता आहे. जपा. श्रद्धा असेल तर श्रीगुरुदेव दत्तात्रेयाची उपासना अनुकुल होईल व मनशांती लाभेल. दररोज नियमितपणे “बावन्न श्लोकी गुरुचारेत्रा"चे पठण करा.

=====00000o00000======